शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्न पारंपारिक महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संदर्भ - १. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं-२०१८/शिष्यवृत्ती/डीबीटी/१७११४ दिनांक. ०४/१०/२०१८ रोजीचे पत्र.

२. या कार्यालयाचे संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/१४८ दि. १२/१०/२०१८ रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भान्वये राज्यशासनाच्या विविध विभागाच्या योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून डीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सरहू पोर्टलमध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ यांची माहिती www.mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे डीबीटी पोर्टलवर अद्ययावत करणेबाबत यापूर्वी या कार्यालयाचे संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/१४८ दि. १२/१०/२०१८ रोजीचे परिपत्रक पाठविले होते. परंतु अद्याप काही महाविद्यालयांकडून उपरोक्तबाबतची पूर्तता केलेली दिसून येत नाही.

याअनुषंगाने डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल तात्काळ अद्ययावत करणे व महाविद्यालयांच्या स्तरावर प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी तात्काळ करणेबाबतचे मा. डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे क्र. उशिसं-२०१८/डीबीटी/१८०३४ दिनांक. २३/१०/२०१८ यांचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ १६०

दि. 24 OCT 2018

d:\mangutkar\circular.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१**
**web: www.dhepune.gov.in** **E-mail: scholarshiphd2@gmail.com**
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 18034
दि. २३/१०/२०१८
23 OCT 2018

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, विभाग.

विषय :- डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल तात्काळ अद्ययावत करणे व महाविद्यालयांच्या स्तरावर प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी तात्काळ करणेबाबत ...

संदर्भ :- संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८ व दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८ रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणे तसेच महाविद्यालयातील लिपीक - प्राचार्य तसेच विभागीय सहसंचालक, यांनी त्यांचे लॉगीनमधून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन त्याबाबत तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भिय पत्रान्वये वारंवार लेखी तसेच सोशल मिडीयाद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि सद्यस्थितीत अनेक महाविद्यालयांचे डीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्यात आलेले नाहीत. तसेच अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांतील लिपीक व प्राचार्य यांच्या लॉगीनमध्ये पडताळणीसाठी दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.

**सदरची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावयाची आहे. तरी याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या अकृषि विद्यापीठे, शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना त्यांचे स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जाबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच ज्या महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करणे प्रलंबित आहे, अशा महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.**

डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत न केल्यामुळे तसेच महाविद्यालयांच्या स्तरावर दीर्घकाळ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहील्यामुळे संबंधित महाविद्यालयांतील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांची राहील.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१**
**web: www.dhepune.gov.in** **E-mail: scholarshiphd2@gmail.com**
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 18035 दि. २३/१०/२०१८

23 OCT 2018

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय :- डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल तात्काळ अद्ययावत करणे व महाविद्यालयांच्या स्तरावर प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी तात्काळ करणेबाबत ...

संदर्भ :- संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८ व दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८ रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणे तसेच महाविद्यालयातील लिपीक - प्राचार्य तसेच विभागीय सहसंचालक, यांनी त्यांचे लॉगीनमधून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन त्याबाबत तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भिय पत्रान्वये वारंवार लेखी तसेच सोशल मिडीयाद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि सद्यस्थितीत अनेक महाविद्यालयांचे डीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करण्यात आलेले नाहीत. तसेच अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांतील लिपीक व प्राचार्य यांच्या लॉगीनमध्ये पडताळणीसाठी दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.

**सदरची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावयाची आहे. तरी याबाबत आपल्या विद्यापीठातील तसेच आपल्या विद्यापीठाशी संलग्न शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना त्यांचे स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जाबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच ज्या महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करणे प्रलंबित आहे, अशा महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.**

डीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत न केल्यामुळे तसेच महाविद्यालयांच्या स्तरावर दीर्घकाळ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहील्यामुळे संबंधित महाविद्यालयांतील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांची राहील.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, विभाग. यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.